दि. 7 जानेवारी, 2014

**<u>सत्यअसत्य विरुद्ध, गुजरात 2002 दंगलीची कहाणी</u>**

**अरुण जेटली**
(विरोधी पक्षनेते, राज्यसभा)

मला शिक्षक आणि सक्रिय कार्यकर्ता असलेल्या मधु पूर्णिमा किश्वर यांच्या द्वारे लिहिले गेलेले पुस्तक "मोदिनामा" याच्या मराठी आवृत्तीच्या प्रकाशनासाठी दि. ४ जानेवारी , २०१४ रोजी पुणे येथे बोलावण्यात आले होते. मधु कधीही भाजपची समर्थक नव्हती. मात्र माझ्या लक्षात आहे कि त्यांनी अनेक ठिकाणी पक्षावर टीका केली आहे. या पुस्तकाचे हिंदी आणि इंग्रजी भाषेतून यायचे अजून बाकी आहे. याचे मराठी मधून प्रकाशन पुण्याच्या विनीत कुबेर यांनी केले. हे पुस्तक लेखिकेच्या अनेक महिने केलेल्या संशोधनावर आधारित आहे. २००२ च्या दंगली संदर्भात त्यांनी अनेक लोकांच्या मुलाखती घेतल्या आणि त्यातून मिळालेल्या माहितीच्या आधारे सत्य या पुस्तकात लिहिले आहे.

या प्रकाशन समारंभात मला जेव्हा बोलण्याची संधी मिळाली, तेव्हा मी त्या अनेक मुद्द्यांना स्पर्श केला जे मुद्दे 2002 च्या दंगलीत नरेंद्र मोदी यांना फसवण्याचा सतत प्रयत्न (किंवा कट) केला गेला. मी या गोष्टीची सुद्धा माहीती दिली की यातून काही प्रयत्न त्यांचे फोस ठरले कारण ते सर्व खोटे होते. मी त्या तीन तथ्यांची माहिती देऊ इच्छितो ज्याचे मी आपल्या भाषणात उल्लेख केला होता.

**प्रथम- साबरमती एक्सप्रेसला कोणी आग लावली.**

हे पहिल्याच दिवसात स्पष्ट होते की गोध्रा रेल्वे स्टेशन वर एका समुदायाशी संबंधित असलेली आणि भटकलेल्या गर्दीने साबरमती च्या डब्याला नंबर एस-6 ला आग लावली. सुरुवातीस या घटनेची चौकशी गुजरात पोलिसांनी केली आणि नंतर सर्वोच्च न्यायालयाने याला एसआयटीकडे सोपविले. सुनावणी पूर्णपणे एसआयटी च्या चौकशीवर आधारित होती, यातून स्पष्ट झाले की, या घटनेच्या एक दिवस आधी गोध्रा मध्ये एक बैठक झाली होती. रेल्वे स्टेशन पर्यंत गाडीमध्ये इंधन पोचवण्यात आले होते. कंपार्टमेंट एस-6 च्या दरवाज्यांना बाहेरुन कडी लावण्यात आली होती, की कोणी बाहेर पडू नये आणि शस्त्रधारी असलेल्या त्या गर्दीने कंपार्टमेंट ला आग लावली.

मीडिया चा एक वर्ग आणि एनजीओने छळ-कपटाच्या आधारे असे आरोप लावण्याचा प्रयत्न केला होता की, ट्रेन ला कोणी बाहेरुन आग नाही लावली, तर आग कंपार्टमेंटच्या आतून लागली. याप्रकरणी सुनावणी पूर्ण झाल्यानंतर मोठ्या संख्येने लोकांना दोषी ठरवण्यात आले ज्यांच्याविरोधात कपट करणे, दंगल करणे आणि हत्या करणे असे आरोप लावण्यात आले. दोषी व्यक्तींचे अपील प्रलंबीत आहेत. इतक्या मोठ्या पुराव्यानंतरही युपीए-1 ने आपल्या रेल्वे मंत्री लालू यादव यांच्या माध्यमातून सेवानिवृत्त न्यायाधीश, यू.सी. बॅनर्जी यांच्या अध्यक्षतेखाली रेल्वे मंत्रालयांतर्गत एका समितीची नेमणूक केली. या समितीने लज्जास्पद माहिती देताना असा आरोप केला की, आग कंपार्टमेंट च्या आतून सुरु झाली असावी. या अहवालाची कोणती विश्वासार्हता नाही राहिली आणि तो अहवाल कच-याच्या डब्यात फेकला गेला. न्यायालयाच्या निर्णयात असे स्पष्ट झाले की, या अहवालातील प्रत्येक तथ्य चुकीचे आहे. खोट्या प्रचाराचे कारण असे होते की, हिंदू समुदायाने कंपार्टमेंट ला आग लावली आणि लोकांच्या भावना भडकून गुजरात मध्ये दंगल होईल.

**दुसरे- मोदींनी प्रतिक्रिया दर्शक मुलाखत दिली नव्हती.**

हे स्पष्ट करण्यासाठी गुजरात मध्ये झालेल्या दंगलीला नरेंद्र मोदी यांनी युक्तीसंगत असल्याचे सांगितले होते. एका प्रतिष्ठित राष्ट्रीय वृत्तपत्राने मार्च 2002 च्या पहिल्या सप्ताहात मोदी यांची कथित मुलाखत प्रसिद्ध केली होती. या कथित मुलाखतीमध्ये मोदी यांच्या हवाल्याने सांगण्यात आले होते की प्रत्येक क्रियेची प्रतिक्रिया उमटते, यासाठी गोध्रा नंतर झालेल्या हिंसेची प्रतिक्रिया म्हणून दंगल घडली. नरेंद्र मोदी सांगत होते की त्यांनी अशी कोणतीही मुलाखत दिली नव्हती. खरे तर हे आहे की, मुलाखतीसाठी त्या वृत्तपत्राचा कोणताही वार्ताहर मोदी यांना भेटला नाही. आश्चर्यजनक आहे की मुलाखत प्रश्न-उत्तराच्या स्वरुपात छापण्यात आली आणि असे दर्शवण्यात आले की जसे मोदी यांनी हिंसेला योग्य असल्याचे सांगितले. गुजरात सरकारने वर्तमान पत्राला लिहिले की अशा प्रकारची कोणतीही मुलाखत देण्यात आली नाही कारण वर्तमान पत्राच्या कोणत्याही प्रतिनिधीची मुख्यमंत्र्यांबरोबर भेट झाली नाही. मात्र यानंतर पुढील 20 दिवसांपर्यंत या पत्रास छापण्यात आले नाही. त्यानंतर संपादकांनी पत्राच्या कॉलममध्ये असे छापले आणि असे स्पष्टीकरण देण्यात आले की, कोणत्याही

वार्ताहराने मोदी यांच्याशी भेट घेतलेली नाही आणि त्यांची मुलाखतसुद्धा घेतली नाही. ही मुलाखत मुख्यमंत्री यांची टिप्पणी आणि त्यांनी दिलेल्या उत्तरांच्या आधारावर तयार करण्यात आली आहे , जे एका इलेक्ट्रॉनिक चॅनलमध्ये आले होते.

**27/2/2002 रोजी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी झालेली बैठक**

असत्याचा हा तिसरा भाग होता ज्याच्या आधारावर नरेंद्र मोदी यांच्या विरोधात आरोप करण्यात आले. मुख्यमंत्री यांच्या घरी झालेल्या बैठकीत तत्कालीन मुख्य सचिव, पोलिस महानिदेशक, मुख्य सचिव (गृह) इत्यादी आणि अन्य वरिष्ठ अधिकारी शामिल होते. त्यात राज्य सरकार आणि पोलिसांचे आठ वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. असा कोणता प्रसंग नव्हता की बैठकीत पोलिस अधिक्षक स्तरावरील अधिकारी संजीव भट्ट उपस्थित होतील. 2006 मध्ये पहिल्यांदा तक्रारदार जाकिया जाफरी यांनी आरोप केला की त्या कथित बैठकीत नरेंद्र मोदी यांनी अधिका-यांना सांगितले होते की, हिंदू समुदायाला आपला राग व्यक्त करण्याची परवानगी दिली जावी. मुख्यमंत्री यांनी याप्रकारचे वक्तव्य करण्याच्या आरोपाचे खंडन केले. याच्या विपरित कठोर पावले उचलण्याची योजना बनवण्यात आली होती की, कोणत्याही प्रकारची हिंसा होऊ नये. मुख्यमंत्री यांनी त्याचवेळी लोकांना शांती आणि संयम राखण्यास सांगितले आणि याबदल्यात कोणत्याही प्रकारच्या हिंसेत शामील होऊ नये अशी विनंती त्यांनी लोकांना केली होती. त्या कथित बैठकीच्या आठ वर्षानंतर भट्ट यांनी आरोप केली की, ते बैठकीत उपस्थित होते जिथे अशाप्रकारचे उकसावणारे वक्तव्य देण्यात आले. एसआयटीने त्या आठ अधिका-यांशी चर्चा केली.  सर्व आठ अधिका-यांनी अशा प्रकारचे वक्तव्य तसेच संजीव भट्ट यांचे उपस्थित असण्याच्या आरोपांचे खंडन केले. एसआयटीला त्यावेळचे अनेक पुरावे मिळाले की, येनकेन प्रकारे प्रयत्न करण्यात आला की, संजीव भट्ट यांना गांधीनगर मध्ये उपस्थित असल्याचे दाखविले जावे मात्र खुप पुरावे असे मिळाले की संजीव भट्ट हे अहमदाबाद मध्ये उपस्थित होते. यात कॉल डेटा रेकॉर्ड शामिल आहेत, ज्यातून कोणत्याही व्यक्तीच्या हालचालींची माहिती मिळू शकते. काही अन्य पुरावे मिळाले त्यातून असे समजले की, कशा प्रकारे एनजीओ, कार्यकर्ते आणि प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या लोकांसह त्या मसुद्यासाठी सल्ला-मसलत करण्यात आली, ज्याला आरोपांच्या समर्थनार्थ सादर करण्यात येणार होते आणि राज्य सरकारला अस्थिर करण्याचा कट रचण्यात आला होता. एसआयटी ने स्पष्ट केले की, संजीव भट्ट बैठकीत उपस्थित नव्हते आणि अशा प्रकारचे कोणतेही वक्तव्य मुख्यमंत्र्यांनी दिले नाही. यात पुढे असे सांगण्यात आले की, मुख्यमंत्र्यांनी त्यावेळी दिलेले वक्तव्य त्यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांच्या एकदम विपरित होते. मॅजिस्ट्रेट न्यायालयाने एसआयटीच्या विचारांचे समर्थन केले.

उपरोक्त तीन मुद्द्यांमुळे सुमारे एक दशक सुरु असलेली मिडीया मधील चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे. यानंतर कमीत कमी त्या लोकांसाठी आत्मपरिक्षण करणे गरजेचे आहे ज्यांनी या असत्याला सत्य करण्याचा प्रयत्न केला. माझे नेहमी असे मानने असते की, खोट्याचा नायनाट होतो आणि सत्याचा नेहमी विजय होतो. हे सांगण्यासाठी यापेक्षा दुसरे उदाहरण नाही.